**पुणे शहरातील एक 'सामाजिक व्यक्तीमत्व व राजकीय नेतृत्व' :**



## मा. गोपाळदादा तिवारी

### संक्षीप्त परीचय (कारकीर्दीचा आढावा)

पुणे शहरातील "सामाजीक जीवनात " अनेक वर्षांहून अधिक काळ 'काँग्रेस पक्षाशी' निष्ठा बाळगून निस्पृहपणे कार्यरत असलेले जेष्ठ सामाजिक व राजकीय व्यक्तीमत्व म्हणजे अर्थात **गोपाळदादा तिवारी !** पक्षाध्यक्षा **श्रीमती सोनियाजी** यांचेवरील अढळ श्रध्दा व नेतृत्वावर 'दृढ विश्वास 'ठेऊन गोपाळदादा अनेक वर्षे कार्यरत आहेत.

नारायण -सदाशिव पेठे सारख्या भागातून **'पुणे मनपा'** वर निवडून येऊन त्यांनी मनपात देखील आपल्या लोकाभिमुख कार्याने ठसा उमटवला आहे. **'लोक प्रतिनिधी'** म्हणून मिळालेली संधी अत्यंत निर्णायक व जनहीताचे व नागरी पैशांचे हीत पाहणारे निर्णय घेऊन, धडाडीने व निर्भिड पणे सार्थ ठरविली आहे. मनपाच्या ठेवी 'राष्ट्रीयकृत बँकेत' ठेवण्याचा निर्णयापासून ते मनपातील १५ वर्षाचा 'ऑडीट ' चा बॅक लॉग भरून काढून, 'वाढीव ' रकमेचे ठराव प्रशासनाकडे फेर विचारार्थ पाठवण्याची त्यांची कारकीर्द सर्वश्रृत ठरली आहे. नागरी हीतास बाधक ठरणारे प्रस्ताव (उदा. सारस बागेतील ट्रॅफीक पार्क असो, वा गरवारे बालभवन येथील नियोजित रोप-वे प्रकल्प इ.) बाबत -स्पष्ट व निर्भिड व प्रसंगी संघर्षाची यशस्वी भूमिका, जागरूक व संवेदनशील 'लोक प्रतिनिधी' म्हणून त्यांनी वेळोवेळी बजावली आहे. पश्चिम भागातील ' स्व. इंदिराजी' यांच्या नावे सरकारी ' जनरल हॉस्पीटल ' चा प्रस्ताव बाबत संघर्षरत लढा देखील त्यांनी दिला .

**नदी पात्रातील रस्ता**, वा **स्व. वसंतदादा पाटील सांस्कृतिक सभागृहाची** उभारणी वा वॉर्ड स्तरीय **फिरत्या कचरा गाड्यांची निर्मिती**, वा पुणे शहरातील पहिले **विद्यानिकेतन क्र. ७** ची उभारणी वा **दिवंगत पंतप्रधान लाल बहाद्दूर शास्त्री व स्व. राजीव गांधी यांचे स्मारक** उभारण्याचे कार्य असो वा श्रीमंत **छ. शिवाजी महाराज यांचे जयंती दिनी** सादर होणाऱ्या **'देखाव्यांना' पुणे मनपा तर्फे 'पारितोषिके'** सुरू करण्याची बाब असो या सारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पांची मुर्हुत मेढ देखील त्यांच्या आग्रही भुमिकेमुळे साध्य झाली हे देखील वास्तव आहे.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस मधे देखील चार अध्यक्षांसमवेत १२ वर्षे काम करून 'सचिव ते सरचिटणीस व (वरिष्ठ) उपाध्यक्ष' पर्यंत काँग्रेस पक्ष संघटनेचे भरीव कार्य केले आहे, व तेथेही आपल्या कामाचा 'ठसा ' उमटविला आहे. तद्नंतर प्रदेश काँग्रेस ते अ.भा.काँग्रेस महासमितीचे ' सदस्य ' पदापर्यंत सतत काँग्रेसचे निष्ठापूर्वक काम करीत आले आहेत. प्रदेश काँग्रेस तर्फे नासिक ग्रामीण, अहमदनगर, अक्कलकोट नगरपालिका इ. ठिकाणी तर अ.भा. काँग्रेस तर्फे छ.गड, हरियाणा व बिहार येथे निरीक्षक म्हणून कर्तव्यनिष्ठ जबाबदारी पार पाडली आहे.

पक्षीय भूमिका बजावत असताना माजी नगरसेवक म्हणून पुणे शहरातील सामाजिक कार्याची 'कास ' कधीही सोडलेली नाही. लोड शेडींगच्या काळात वैकुंठ विद्युत दाहिनीची समस्या असो वा गरीबांना (कुत्रा चावल्यावर) 'रेबीजची लस' सरकारी दवाखान्यातून उपलब्ध करून देण्याचा प्रश्न असो वा नदी पात्रातील राड्यारोड्याचा प्रश्न असो त्यांचे संवेदनशील 'सामाजीक मन' सतत जागरूक असल्याचेच पुणेकरांना पहायला मिळाले आहे.

नूमवीय माजी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून ' आरोग्यविषयक -व्याख्यानमाला ' असो वा मराठी राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या (कळत नकळत, व श्वास) चित्रपटातील कलाकारांचा सत्कार असो, गोपाळदादांचे 'सांस्कृतिक मन' त्यातही कार्यरत राहिले आहे. शहरातील विकासाच्या प्रश्नात वेळोवेळी आपली ' सामाजिक जबाबदारी ' पार पाडण्यात ते कधीही मागे हटले नाहीत. पुणे शहराच्या 'विकास आराखड्याचा' प्रश्न असो वा 'सीएनजी' पुरवठ्याचा रिक्षा चालकांचा प्रश्न असो वा "शहर गावठाण" मधील जुन्या वाड्यांचा वा भाडेकरूंचा प्रश्न असो -योग्य बाबतीत 'चर्चा -परिसंवाद ' घडवून आणून ते **मा.ना. मुख्यमंत्र्यां** पर्यंत आपले म्हणणे वा मागणी रेटण्यात ते सतत प्रयत्नशीलच् राहीले आहेत.

१९९७ नंतर पासून (आजतागायात एकही ' सत्तेचे पद ' न मिळून देखील) , गेली १४ वर्षे सातत्याने "सामाजिक कार्य" करीत "पक्षाची निष्ठा" जोपासत अत्यंत निस्पृहपणे काम करीत, स्वच्छ चारित्र्याचे, निष्कलंक व्यक्तीमत्वाचे उदाहरण मा. गोपाळदादा तिवारी हे आहेत. प्रत्येक निवडणूकीत ती पुणे मनपाची असो, विधानसभा वा लोकसभा असो मा. गोपाळदादा हे 'पक्षीय बांधीलकी व निष्ठा' ठेऊन हमखास सेवाभावीपणे काम करणारे निष्ठावान परंतू कर्मठ कार्यकर्ते म्हणूनच पुणे शहरात त्यांची ओळख आहे. काँग्रेस पक्षीय राजकारणात सच्च्या व सेवाभावी - निष्ठावान कार्यकर्त्यांना न्याय मिळवून देण्याबाबत देखील त्यांचे प्रयत्न राहिले आहेत.

पुणे शहरातील 'सद्य: राजकीय परिस्थितीत' अशा निस्पृह-चारित्र्यसंपन्न व निर्भिड, सक्षम व कार्यक्षम जेष्ठ व्यक्तिमत्वास वाव देणे हे आम्हास अत्यंत गरजेचे वाटत आहे. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन **' राष्ट्रीय पातळी ' वरील** संस्थांनी त्यांना **'भारत ज्योती अवॉर्ड '** तसेच **' बेस्ट सिटीझन ऑफ इंडिया'** इ. पुरस्कार देखील दिले आहेत.

सुर्यकांत उर्फ नाना मारणे
मा. उपाध्यक्ष - पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी

दिलीप मोरे
जेष्ठ काँग्रेसजन-पुणे शहर